# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

दुरध्वनी : ०७२१-२६६८०६८ Email: directornss@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/रासेयो/१७/२४५/२०२५
दिनांक : ३१/१०/२०२५

**प्रति,**

**मा. प्राचार्य,**
**सर्व रासेयो महाविद्यालये,**
**संलग्नित, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,**
**अमरावती**

**विषय :- राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत क्षेत्रिय समन्वयक (विभागीय समन्वयक) पदाच्या नेमणुकीसाठी अर्ज पाठविण्याबाबत.**

**मा.महोदय/महोदया,**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये सुमारे २७,६०० रासेयो स्वयंसेवक आणि ४३६ रासेयो कार्यक्रम अधिकारी या विभागाच्या माध्यमातून आपआपल्या महाविद्यालय/दत्तकग्राम पातळीवर सामाजीक कार्यात्मक योगदान देत आहे. विद्यापीठाच्या वाटचालीत व प्रभावशाली मानांकनात महत्वाची भर घालत आहे. हि वाटचाल अधिक गतीमान करणे ही रासेयो विभागाची व आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

महाविद्यालयीन पातळीवरील नियमित कार्यक्रम, विशेष श्रमसंस्कार शिबिर आणि विविध परिपत्रके शिवाय राज्य व राष्ट्रीय पातळींवरील ध्येय धोरणांना अनुसरुन जे कार्यक्रम आपल्याकडे सुपूर्द केले जातील त्याची कठोर अंमलबजावणी, त्यांचे नियोजन व अंकेक्षण अतिशय महत्वाचे आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रासेयो संलग्नित महाविद्यालयामध्ये रासेयो विद्यार्थ्यासाठी विविध सांस्कृतीक व सामाजिक उपक्रम महाविद्यालयस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, विद्यापीठस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तरावर राबविले जातात. तसेच आव्हान, उत्कर्ष, हिवाळी शिबिर, राष्ट्रीय एकता शिबिर, राष्ट्रीय व राज्य स्तरीय पथसंचलन, राष्ट्रीय व राज्य साहसी शिबिर, यासारखी शिबिरे आयोजीत केली जातात.

वरील शिबिरांचे आयोजन तसेच या शिबिरांसाठी विद्यार्थ्यांचा सराव करुन घेणे आणि वेळोवेळी शिबिरासोबत संघनायकाची निवड व विद्यार्थ्यांची निवड करण्याची जबाबदारी पार पाडणे, विभाग/जिल्हास्तरीय उपक्रमामध्ये सुसुत्रता यावी, शासनाचे/विद्यापीठाचे उपक्रम/परीपत्रके महाविद्यालयाकडे वेळेवर पोहोचावीत, महाविद्यालयांना आलेल्या अडचणींचे निराकरण विभाग स्तरावर करण्यासाठी क्षेत्रिय समन्वयकांची मदत होईल व त्यामुळे जिल्हा समन्वयकांना अधिक कार्यक्षमपणे जिल्हास्तरीय उपक्रम राबविणे शक्य होईल. जिल्हा समन्वयक हे क्षेत्रिय समन्वयकांशी चर्चा करून कामाची विभागणी करतील व सर्व महाविद्यालयातील उपक्रम/शिबीरे यांना भेटी देणे शक्य होईल म्हणून रासेयोचे कार्यक्रम अधिक सुरळीतपणे राबविण्याकरीता क्षेत्रिय समन्वयकांची नेमनूक करणे आवश्यक आहे.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत अमरावती शहर, अमरावती ग्रामीण, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या पाच जिल्हयामध्ये रासेयोचे अधिक मजबूत संरचन करण्यासाठी रासेयो विभागाकडून ३६ क्षेत्रिय समन्वयक (विभागीय समन्वयक) यांचे मा. कुलगुरु यांच्याकडून नामनिर्देशन करण्यात येणार आहे. आपल्या महाविद्यालयातील क्षेत्रिय समन्वयक (विभागीय समन्वयक) पदाकरीता इच्छूक राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांची व योजनांची माहिती असणाऱ्या शिक्षकांची विस्तृत माहिती (बायोडाटा) कार्यात्मक सारांक्षासह व मार्गदर्शक तत्वामधील पात्रतेच्या पुराव्यासह आपल्यामार्फत राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती विभागाकडे शनिवार दि. १५/११/२०२५ पर्यंत आपल्या शिफारसीसह पाठविण्यात यावी. हि विनंती.**

**सहपत्र :-१.**

आपला

**(डॉ. निलेश कडू)**
**संचालक,**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

प्रतिलिपी :

मा. कुलगुरु/अध्यक्ष राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
मा. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

## क्षेत्रिय समन्वयक(विभागीय समन्वयक) नेमण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

**पात्रता :-**

१) राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी म्हणून कमीत कमी दोन व तीन वर्षे काम केलेले असावे.
२) रासेयो अंतर्गत कमीत कमी दोन विशेष शिबिरांचे आयोजन केलेले असावे.
३) रासेयो शिबीर किंवा नियमीत कार्यक्रमाचे लेखे अहवाल वेळेत विद्यापीठास सादर केले असावे.
४) रासेयो उद्‌बोधन वर्ग प्रशिक्षण (अहमदनगर येथील ETI Training) पुर्ण केले असावे.